अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# घुसमटणारी गावे आणि सरकारी ढिगारे

पुणे जिल्ह्यातल्या माळीण गावावर पावसाने घातलेला घाला जितका खरा तितकाच या गावात सरकारचे असलेले दुर्लक्षही तितकेच जबाबदार ठरते. आख्खा डोंगरच्या डोंगर खचतो आणि गावाला जमीनदोस्त करून जातो ही गोष्ट केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून सोडून देता येत नाही. ग्रामीण भागातले जनजीवन आजही किती निराश्रीत स्वरूपात आहे याचे ते निदर्शक ठरते. लोकांना आपल्याकडची जमीन वाचवायची असते. किंवा मिळेल तिथे थोडीशी जमीन घेऊन आपल्या आयुष्याची गुजराण करायची असते. शहरांसारखा लखलखाट आणि पैशांचा चमचमाट तिथे नसतो. सूर्य उगवल्यापासून ते मावळेपर्यंत काबाडकष्टाच्या उन्हामध्ये हे रापलेले शरीर जेमतेम उभारलेल्या घरामध्ये विश्रांती घेण्याचा प्रयत्न करते. रोजगाराच्या पुरेशा संधी नसतात. शेती आणि पशुपालनासारख्या जोडधंद्यावर उपजीविका चालू असते. फार तर फार शेजारच्या घरात जाऊन पाच पन्नास रुपये कमावण्याइतपतच ग्रामीण भागातला हा गावकरी प्रयत्नांची शिकस्त करीत असतो, आहे. त्या परिस्थितीत शक्य तेवढे सुखाने राहण्याचा त्याचा प्रयत्न निसर्गालाही मान्य झालेला दिसत नाही आणि सरकार तर ग्रामीण भागासाठी निरुपयोगी ठरल्यासारखी परिस्थिती आहे.

तीनशे ते पाचशे वस्तीचे हे गाव कशा परिस्थितीत राहते आहे. त्या गावाची व्यवस्था काय तिथे डोंगर खणून प्लॉट पाडले जात असताना सरकारचे त्याकडे लक्ष नव्हते काय आणि गावाला देखील आपल्याच शेजारचा डोंगर जो इतके दिवस आधार वाटत होता तोच आपल्यावर कोसळेल याची जरासुध्दा जाणीव झाली नाही का असे प्रश्न निर्माण होतात. आंबेगाव तालुक्यातल्या या गावाची ही दुर्दैवी कहाणी खरे तर राज्यातल्या अनेक गावांना लागू पडेल. वीस वर्षापूर्वी अशाच एका धो धो पावसाने ठाणे जिल्ह्यातले जांभूळपाडा हे गाव वाहून जाण्याचा प्रकार घडला होता. तर आजही मोठमोठ्या धरणांलगतची अनेक कामे अशाच अचानक येणाऱ्या महापूराच्या टप्प्यात वसलेली आहे. पण सरकारचे त्याकडे अजिबात लक्ष नाही. गावांकडे सरकारचे नेहमीच दुर्लक्ष होत आलेले आहे आणि विकासाच्या जेवढ्या काही योजना असतील. त्या अधिकाधिक शहरांमध्येच राबवल्या गेल्या आहेत. मूलभूत सुविधा देण्याचे भानसुध्दा सरकारला नाही. पिण्याचे पाणी आरोग्यसेवा शाळा किंवा रस्ते, वीज यासारख्या गोष्टी नित्याच्या असताना देखील सरकारकडून त्याची दखलही घेतली जात नाही. प्रगतीचे सगळे रस्ते शहरांमध्येच येऊन थांबतात आणि खेड्यांची वाट लावतात. अख्खे गाव दरडीखाली दबले जात असताना त्याची माहिती देणारी एकसुध्दा यंत्रणा किंवा व्यवस्था तिथे अस्तित्वात नव्हती. यावरून एकूणच ग्रामीण भाग हा प्रगती आणि विकासापासून कसा शेकडो मैल लांब आहे हे सिध्द होते.

## वाढत्या नागरीकरणाचे चटके

नैसर्गिक संकट केव्हा आणि कसे कोसळले हे सांगता येत नाही. परंतु त्याहीपेक्षा आपल्याच नादानपणामुळे आणि सरकारच्या नाकर्तेपणामुळे अनेक संकटांना आमंत्रणे दिली जातात.आंबेगाव तालुक्यातल्या माळीण गावावर कोसळलेले हे संकट ही एकूणच सामाजिक आणि सरकारी गलथानपणाची शोकांतिका म्हणावी लागेल. एकीकडे माहिती तंत्रज्ञानाचे गोडवे गायले जात आहेत. पण हे तंत्रज्ञान किंवा विज्ञान अशा संकटांपासून जीवदान देऊ शकत नाहीत हे यानिमित्ताने स्पष्ट होते. कारण एखादी गोष्ट काळाच्या ओघात घडत असताना ती भविष्यकाळातील संकट ठरणार आहे याचा कोणताच विचार होत नाही. हे गाव डिंभे धरणापासून पाच दहा किलोमीटरच्या अंतरावर आहे. प्रसिध्द भीमाशंकर मंदिराच्या जवळ असणाऱ्या या गावाला डोंगराळ परिसराने वेढलेले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या भागामध्ये प्रचंड प्रमाणात जंगलतोड झाल्याच्या तक्रारी होत होत्या.

पुण्यापासून ७५ किलोमीटरच्या या भागालाही जागांच्या वाढत्या किमती खुणावू लागल्या होत्या. अशा अनेक कारणांमुळे गावाच्या धोक्यांमध्ये तशी वाढ झाली होती. पण ती ओळखण्याचे किंवा रोखण्याचे धैर्य कोणालाच झाल्याचे दिसत नाही. ही गोष्ट केवळ त्या एका खेड्याचीच नाही तर आजही अनेक खेडी आणि आदिवासी पाडे अशाच एका आक्राळविक्राळ भयाच्या छायेखाली वावरत आहेत. सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की, अचानकपणे उद्भवणाऱ्या या संकटांशी सामना करणाऱ्या यंत्रणाच आपल्याकडे नाहीत. शहरामध्ये त्या थोड्याफार प्रमाणात दिसून येतात. पण ग्रामीण भागातल्या खेड्यापाड्यांना त्यांच्याच भरोशावर सोडून दिले जाते. अशावेळी सरकार मदत करणार नाही हे लक्षात ठेवूनच खेड्यातला हा गावकरी जीवावर उदार होऊन राहात असतो. आजच्या बदलत्या परिस्थितीत खेडी असो किंवा आदिवासी पाडे असो, या सगळ्यांशी अत्याधुनिक संपर्क यंत्रणा तिथे आल्या पाहिजेत. तंत्रज्ञान उपलब्ध आहे. परंतु ते खेड्यापाड्यापर्यंत पोहचवण्याचे कौशल्य दाखवले जात नाही. त्यासाठी राजकीय आणि सामाजिक इच्छाशक्तीही दिसत नाही. जर ताकदवान संपर्क यंत्रणा असती तर घटना घडल्यानंतर पंधरा मिनिटात मदतकार्याला सुरुवात होऊ शकली असती. याही पलिकडे जाऊन गावांच्या रचना व्यवस्था आणि गरजा याकडे गांभिर्याने पाहण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. आज गावेच्या गावे केवळ आपल्याच भरोशावर जगत आहेत. ज्यांना सरकारी हमीचीदेखील तितकीच गरज आहे.

## शहरातही डोंगरांवर वस्ती

खरे सांगायचे तर वाढत्या नागरीकरणानेसुध्दा अशा प्रकारच्या समस्या निर्माण केल्या आहेत. आज अनेक मोठ्या शहरांना लागून असलेल्या डोंगरांवर झोपडपट्ट्यांचे थवेच्या थवे दिसतात. मुंबईत सायन बांद्रा या परिसरात डोंगरांच्या आडोशाला अनेक झोपड्यांमध्ये लोक राहत आहेत. मुंब्र्यातल्या डोंगरावर आज जवळपास लाख दोन लाखाची वस्ती झाली आहे. इथेसुध्दा धो-धो पडणाऱ्या पावसामुळे केव्हाही कसेही संकट उभे राहू शकते. या झोपड्या उभ्या राहत असताना सरकारने केलेले दुर्लक्ष अक्षम्य स्वरूपाचेच ठरते. केवळ राजकीय हडेलहप्पीपोटी स्थानिक राजकारणीसुध्दा त्याकडे दुर्लक्ष करतात आणि गरजेपोटी राहाणाऱ्या या निराधारांना संकटांच्या तोंडात ढकलतात. एक गोष्ट मात्र खरी की नैसर्गिक आपत्तीपेक्षाही वेगवेगळ्या कारणांनी निर्माण होणाऱ्या संकटांमुळे आपल्या देशात सर्वाधिक प्राणहानी होते. त्याचे ताजे उदाहरण म्हणजे माळीण गावच्या संकटाकडे पाहावे लागेल.